# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक : ५२ / २०२३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित सर्व संबंधित संशोधन केंद्रांचे मा. प्राचार्य/ संचालक, तसेच मा. विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, विद्यापीठ परिसर यांना कळविण्यात येते की, सन २०२२ मधील पीएच्.डी अभ्यासक्रमासाठी दुसऱ्या प्रवेश फेरीला सुरूवात झालेली आहे. यापूर्वीच परिपत्रक क्र. शै.प्रवेश/१५१३ दि. २७/०३/२०२३ अन्वये दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. तथापी सुलभ संदर्भासाठी सदर प्रवेश फेरीच्या तारखा खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | संशोधक मार्गदर्शकांनी जागा अद्ययावत करणे. | दिनांक: २१/०३/२०२३ ते ०४/०४/२०२३ |
| २. | मार्गदर्शकांनी अद्ययावत केलेल्या जागा संशोधन केंद्रांनी आरक्षणनिहाय निश्चित करणे. | दिनांक: ०५/०४/२०२३ते १०/०४/२०२३ |
| ३. | विद्यार्थ्यांनी आरक्षणनिहाय उपलब्ध रिक्त जागा विचारात घेऊन संशोधन केंद्र निवडणे/बदलणे. | दिनांक: ११/०४/२०२३ते २०/०४/२०२३ |
| ४. | विद्यापीठाकडून संशोधन केंद्रांना विद्यार्थ्यांनी निवडलेल्यानुसार याद्या पाठविणे. | दिनांक: २१/०४/२०२३ते २२/०४/२०२३ |
| ५. | संशोधन केंद्रानी मुलाखतींचे आयोजन करून मुलाखत प्रक्रिया पूर्ण करणे. | दिनांक: २३/०४/२०२३ ते १५/०५/२०२३ |

पीएच्.डी. अभ्यासक्रमासाठी वेगवेगळया अनुदान संस्थांकडून (सारथी, बार्टी, समाजकल्याण विभाग इ.) आर्थिक साहाय्य देण्यात येते. त्यासाठी अर्ज दाखल करण्याच्या तारखा वेळोवेळी प्रसिद्ध केल्या जातात. सबब, वरील वेळापत्रकानुसार विहित निवड समितीमार्फत मुलाखतीचे आयोजन करून संशोधन प्रस्ताव विद्यापीठाकडे मान्यतेसाठी पाठवावेत जेणे करून विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या/आर्थिक साहाय्याच्या लाभापासून वंचित राहणार नाहीत.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

संदर्भ क्र. शै.प्रवेश/१७६५ )
दिनांक : ०६/०४/२०२३ )

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—**

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य/संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे .

E:\PGSECTION\PH.D\PH.D. ADMISSION 2022-23\CIRCULAR.DOCX